• शरारतमध्ये पुन्हा एकवार किशोरकुमार महंमद रफीच्या आवाजात दोन मानलेल्या धाकट्या बहिणीला-लता मंगेशकरला रक्षाबंधन भेट • बँक मॅनेजरमधील सहा गाण्यात एक लता, चार आशा

***शरारत*(१९५९):**

१९५९चा शंकर-जयकिशननी संगीतबद्ध केलेला आणखी एक चित्रपट म्हणजे एच. एस. रवैल यांचा *शरारत*. किशोरकुमार या चित्रपटाचा नायक होता. पण यापूर्वीच्या त्याच्या *रागिणी* या चित्रपटाप्रमाणेच या चित्रपटातील एक गाणे तो रफीच्या आवाजात गाऊन गेला होता. हे गाणे म्हणजे 'अजब दास्ता है तेरी ए जिंदगी...' या चित्रपटात दोन भागात होते. हिंदी चित्रपट संगीतात पियानोवरील गाण्याची एक परंपरा आहे. हे गाणे या परंपरेतीलच एक गाणे होते. किशोरकुमारचा या चित्रपटात डबल रोल होता. आणि मीनाकुमारी व कुमकुम या त्याच्या दोन नायिका होत्या. किशोरकुमार नायक असल्यामुळे या चित्रपटातील मीनाकुमारीच्या मध्यंतरापर्यंतच्या भूमिकेवर तिच्या ट्रॅजेडी क्वीनच्या भूमिकेचा शिक्का नव्हता. या भूमिकेत एक अवखळपणा होता. यामुळे लताबाईंनी गायलेले 'तेरा तीर ओ बेपीर दिल के आरपार है...' हे अवखळ गाणे या चित्रपटात मीनाकुमारी पडद्यावर गाऊन गेली होती. लताबाईंनी या चित्रपटातील 'देखा बाबू छेड का मजा मीठा मीठा दर्द दे दिया...' हे आणखी एक गाणे गायले होते. रफीने गायलेले केवळ एकच गाणे नव्हे तर दोन गाणी या चित्रपटात किशोरकुमारवर चित्रित करण्यात आली होती. यापैकी 'अजब दास्ता है तेरी...' या गाण्याविषयी मी तुम्हाला सांगितलंच आहे. दुसरं गाणं म्हणजे रफीने लताबाईंच्याबरोबर गायलेले 'लुक्का, लुक्का, तू मेरा कॉपी राईट मै तेरी कॉपी राईट...' किशोरकुमार व कुमकुम या दोघांवर हे गाणे चित्रित करण्यात आले होते. हे गाणे तसे किशोरकुमारच्या गाण्याच्या शैलीतले एक अवखळ गाणे होते. तरीही त्या गाण्यात त्याला रफीचा उसना आवाज देण्यात आला होता. कारण वैवाहिक जीवनातील तणाव व मागे लागलेला इन्कम टॅक्सचा फेरा यामुळे वैयक्तिक जीवनात किशोरकुमार तेव्हा एकदम सैरभैर झाला होता. या सैरभैरावस्थेमुळे गाण्याच्या रेकॉर्डिंगला तो वेळेवर येईलच याचा काही भरवसा नसायचा. यामुळे अनेक संगीतकार त्याची गाणी इतर गायकांच्या आवाजात तेव्हा रेकॉर्ड करून ठेवू लागले होते. रफीच्या आवाजात दोन गाणी गाताना किशोरकुमारने *शरारत*मधील चार गाणी स्वतः गायली होती. 'हम मतवाले नौजवा, मंजिलो के उजाले...' व 'खोल दे खोल दे खिडकी चाहत के नाम पे...' ही या चित्रपटातील दोन गाणी किशोरकुमारच्या एकट्याच्या आवाजात होती व 'देख आस्माँ में चांद मुस्कुराए...' व 'तुने मेरा दिल लिया तेरी बातों ने जादू किया...' ही दोन गाणी गीता दत्तबरोबर. हसरत व शैलेंद्र यांनी या चित्रपटातील गाणी लिहिली होती. किशोरकुमारबरोबर राजकुमार या चित्रपटातला दुसरा नायक होता. पण या चित्रपटातील त्याची भूमिका गीतविरहित होती.



किशोरकुमार



चाचा जिंदाबाद

***चाचा जिंदाबाद*(१९५९):**

*शरारत*प्रमाणेच किशोरकुमारची उटपटांग गाणी असलेला १९५९चा आणखी एक चित्रपट म्हणजे अभिनेता ओमप्रकाशने निर्माण केलेला *चाचा जिंदाबाद*. मदनमोहन या चित्रपटाचा संगीतकार होता. किशोरकुमार नायक असल्यामुळे या चित्रपटाचा बाज विनोदी चित्रपटाचा होता आणि ही गोष्ट लक्षात घेऊनच ओमप्रकाशने या चित्रपटात किशोरकुमारबरोबर स्वतः भूमिका करताना भगवान, मनोरमा, सुंदर, केश्टो मुखर्जी, टुनटुन या विनोदी कलावंतांचीदेखील या चित्रपटात खोगीरभरती केली होती. तरीही हा चित्रपट काही विनोदी गाण्यासाठी गाजला नव्हता. तर 'प्रीतम दरस दिखाओ तुम बिन रौ रौ नैन बिताई...' व 'बैरन नींद न आए मोहे, बैरन नींद न आए...' या अभिजात गाण्यासाठी गाजला होता. यापैकी पहिले गाणे लता व मन्ना डे यांनी गायले होते, तर दुसरे गाणे लताबाईंनी एकटीने.

लताबाईंच्या आवाजात असे माधुर्य आहे की, या माधुर्यात त्यांच्या आवाजात रॉक एन रोल गाण्याची कोणाला कल्पनाही करता येणार नाही. पण विश्वास ठेवा अगर ठेवू नका, *चाचा जिंदाबाद*या चित्रपटात मदनमोहनच्या संगीतात त्यांनी एक रॉक एन रोल गाणे गायले होते. पण ते चित्रपटात समाविष्ट झाले नाही. चित्रपटात समाविष्ट न झालेली अनेक गाणी रेकॉर्ड[illegible] येतात आणि रेकॉर्डद्वारा श्रोत्यांच्या कानापर्यंत पोहोचतात. पण *चाचा जिंदाबाद*मधील लताबाईंचं रॉक एन रोल गाणं रेकॉर्डद्वारादेखील श्रोत्यांच्या कानापर्यंत पोहोचले नाही. कारण या गाण्याची रेकॉर्डच निघाली नाही. का? तीदेखील सांगण्यासारखी एक कहाणी आहे.

ओमप्रकाश व लताबाई यांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते. ओमप्रकाश तर लताबाईंना आपली धाकटी बहीणच मानत होता. यामुळे *चाचा जिंदाबाद*मधील रॉक एन रोल गाणी ध्यानीमनी नसताना एकदम त्यांच्यासमोर आली तेव्हा त्यांना नाही म्हणवेना. ओमप्रकाशबरोबर

गाणी गायला ● *चाचा जिंदाबाद*साठी निर्माता-अभिनेता ओमप्रकाशने म्हणून चित्रपटातील एक रॉक ॲण्ड रोल गाणं वजा करून दिलं भोसले तर एकमेव गाणं मन्ना डेने गायलं.

□ इसाक मुजावर

असलेले आपले जिव्हाळ्याचे संबंध टिकविण्यासाठी हे गाणे त्यांनी गायले. तरीही या अशा गाण्यामुळे आजवरच्या आपल्या गायकीला बट्टा लागेल, असे त्यांना मनातून कोठेतरी वाटत होते. हा बट्टा नको म्हणून त्यांनी रक्षाबंधनाचा मोका साधला. ओमप्रकाशच्या हातात एक राखी बांधून त्यांनी त्याला विचारले, "बहीण म्हणून मी तुझ्या हाती राखी बांधली आहे. या राखीच्या बदल्यात बहीण म्हणून रक्षाबंधनाची जी भेट मी तुझ्याकडे मागेन ती तू मला देशील का?"



ओमप्रकाश



मदन मोहन

"मागून तर बघ, तुझा हा भाऊ मागे हटणार नाही."

ओमप्रकाशचे हे उत्तर ऐकून लताबाईंनी *चाचा जिंदाबाद*मधील त्यांनी गायलेले रॉक एन रोल गाणे त्या चित्रपटातून कापून टाकण्याची मागणी त्याच्याकडे केली आणि त्यानेही या गाण्याच्या रेकॉर्डिंगवर झालेल्या खर्चावर पाणी सोडून ते गाणे त्या चित्रपटातून कापून टाकण्याची भेट त्यांना दिली. हे गाणे चित्रपटातून बाजूला झाल्यामुळे या चित्रपटातील लताबाईंच्या 'प्रीतम दरस दिखाओ...' व 'बैरन निंद न आए...' या गाण्यांची अभिजातता टिकली.

दोन अभिजात गाणी गात असताना लताबाईंनी या चित्रपटातील दोन विनोदी गाणीदेखील किशोरकुमारबरोबर गायली. या दोन गाण्यांपैकी 'बडी चीज है मुहब्बत ऐसी...' या गाण्यात त्या दोघांच्याबरोबर कोरसचा आवाज होता. तर 'बन गए हम दोनो फसते फसते हम भी चले और तुम भी चलो...' या गाण्यात फक्त त्या दोघांचा आवाज, ही दोन्ही गाणी किशोरकुमार व या चित्रपटाची नायिका अनिता गुहा यांच्यावर चित्रित करण्यात आली होती. आणि किशोरकुमारच्या धम्माल कॉमेडीतच ती रंगली होती. याच कॉमेडीचा धागा पकडून किशोरकुमारने या चित्रपटातील 'क्या क्या करे प्रीत रामा...' व 'ऐ हसीनो नाजनीना, मैं दिल हथेली पे लेके आ रहा हूं...' ही दोन गाणी एकट्याने गायली होती. बैठकीच्या गाण्याचा बाज असलेली या चित्रपटातील 'नजर उठाके जरा देख ले परदा हटाके जरा देख ले...' व 'जाओ जी जाओ तुम्हे मान लिया सैया अब तो न छेडा करो...' ही दोन गाणी आशाबाईंच्या आवाजात होती. या चित्रपटातील एकजात सारी गाणी राजेंद्रकृष्णनी लिहिली होती.

बँक मॅनेजर (१९५९):

मदनमोहनच्या संगीतात लताबाईंच्या आवाजाचे स्थान असे अनन्यसाधारण होते की, या आवाजाच्या प्रभावाखाली त्याच्या संगीतात इतर गायिकांचा आवाज अनेकदा दबला जायचा. पण १९५९चा त्याच्या संगीतातला *बँक मॅनेजर* हा चित्रपट मात्र याला अपवाद होता. हा चित्रपट मदनमोहनच्या इतर चित्रपटांप्रमाणे पूर्णपणे लतामय झालेला चित्रपट नव्हता. या चित्रपटात एकूण सहा गाणी होती. या सहा गाण्यांपैकी 'कदम बहके बहके, जिया धडक धडक जाए' या एकाच गाण्यात लताबाईंचा आवाज ऐकू आला होता. त्यांच्या आवाजाहून आशाबाईंच्या आवाजाला या चित्रपटात अधिक झुकतं माप मिळालं होतं. 'मेरा दिलबर हजारो में एक है...', 'सबासे ये कह दो की कलियां बिछाए...', 'दरिया का किनारा, हाय हाय बाहो का सहारा...', 'अजी ओ ओ जरा अपनी निगाहों को संभाले...' ही चार गाणी या चित्रपटात आशाबाईंच्या आवाजात होती. या साऱ्या गाण्यात एक शायराना अंदाज होता. मिनू मुमताज ही नृत्यतारका तेव्हा अशी शायराना अंदाजातील गाणी पडद्यावर चांगलीच खुलवायची. यामुळे आशाबाईंच्या आवाजाशी तिच्या अदाकारीचा सूर तेव्हा चांगलाच जुळला होता. *आखरी डाव, चौदहवी का चाँद* यासारख्या अनेक चित्रपटातून *बँक मॅनेजर*मधील मदनमोहनच्या संगीतातील आशाबाईंची गाणी व मिनू मुमताजची अदाकारी म्हणजे याची सुरुवात होती. आणि कामिनी कौशल जरी या चित्रपटाची नायिका असली, तरी आशाबाईंच्या गाण्यावरील अदाकारीमुळे मिनू मुमताजच या चित्रपटातच अधिक भाव खाऊन गेली होती. आशाबाईंच्या आवाजातील 'सबासे ये कह दो की कलिया बिछाए...' हे गाणे व या गाण्यावरील मिनू मुमताजची अदाकारी ही या चित्रपटातील एक देखनेकी चीज होती. हे गाणेच या चित्रपटातील सर्वाधिक लोकप्रिय गाणे होते.

गायकाच्या आवाजातील एकच गाणे या चित्रपटात होते 'जब दिल में नही है खोट तो फिर क्यूं डरता है...' हे गाणे म्हणजे एक पार्श्वगीत होते. आणि ते मन्ना डेने गायले होते. अभिनेता शेखरच या चित्रपटाचा नायक व निर्माता होता. १९५०चा *आँखे* मदन मोहनने संगीतबद्ध केलेला पहिला चित्रपट. शेखर या चित्रपटाद्वाराच नायक म्हणून आपल्या चित्रपटात आला. आणि पुढे तो निर्माता बनला. *छोटे बाबू, आखरी डाव, बँक मॅनेजर* हे चित्रपट त्याने निर्माण केले. त्याच्या या साऱ्या चित्रपटांचे संगीतनियोजन मदन मोहननेच केले होते. हे सारे चित्रपट आज विसरले गेले आहेत. पण या चित्रपटातील मदनमोहनचे संगीत आजही विसरले गेलेले नाही.

*बँक मॅनेजर*ची गाणी जलाल मलीहाबादी व अन्वर फरूखाबादी यांनी लिहिली होती. ●